"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

# विवेकानंद कॉलेज, (अधिकारप्रदत्त स्वायत्त)

## समाजशास्त्र विभाग

### सरप्राईज टेस्ट प्रश्नपत्रिका

Sem - V B.A. III    दि. 02/08/2024

---

**प्रश्न १. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** (गुण १०)

१) सामाजिक संशोधनाचा अर्थ व वैशिष्ट्ये सविस्तर स्पष्ट करा.

**किंवा**

२) नमुना निवड पद्धतीचे प्रकार सविस्तर स्पष्ट करा.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with OKEN Scanner

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

# विवेकानंद कॉलेज, (अधिकारप्रदत्त स्वायत्त संस्था)

## समाजशास्त्र विभाग

दि.02/08/2024

### Surprise Test Attendance

| अ.क्र. | विद्‌यार्थ्यांचे नाव | सही |
| --- | --- | --- |
| १. | ऋतुजा जितेंद्र वाघावेकर | R.J.Vaghvekar |
| २. | स्वीटी प्रशांत लोखंडे | S.P. Lokhande |
| ३. | शिवलीला दिलीप चौगले | S.D. Chougale |
| ४. | समीक्षा सुदर्शन बेडकाळे | S.S. Bedkale |
| ५. | रुहाना सरदार देसाई | R.S.D. |

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR * (Empowered Autonomous) * ESTD JUNE 1964

श्री. एच. व्ही. चामे
**HEAD**
DEPARTMENT OF SOCIOLOGY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(EMPOWERED AUTONOMOUS)

Scanned with OKEN Scanner

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार"
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

# विवेकानंद कॉलेज, (अधिकारप्रदत्त स्वायत्त संस्था)

## समाजशास्त्र विभाग

दि. 02/08/2024

### Surprise Test Result

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | गुण |
|---|---|---|
| १. | ऋतुजा जितेंद्र वाघावेकर | 08 |
| २. | स्वीटी प्रशांत लोखंडे | 05 |
| ३. | शिवलीला दिलीप चौगले | 07 |
| ४. | समीक्षा सुदर्शन बेडकाळे | 07 |
| ५. | रुहाना सरदार देसाई | 08 |

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

श्री. एच. व्ही. चामे
HEAD
DEPARTMENT OF SOCIOLOGY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(EMPOWERED AUTONOMOUS)

Scanned with OKEN Scanner

08/10

॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ॥
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

42702

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**SUPPLIMENT**

Name :- Rutuja Jitendra Wagavekar

Suppliment No. :

Roll No. : 4960

Class : BA.TY

Signature of Supervisor

Subject : समाजशास्त्र

Test / Tutorial No. : पेपर नं - 8.

Div. : sem - 5 दि. 02/08/2024

प्र. 1] सामाजिक संशोधन - अर्थ आणि वैशिष्ट्ये.

सामान्यपणे ज्ञानाचा शोध घेणे म्हणजे संशोधन होय. काही लोकांच्या दृष्टीने संशोधन म्हणजे एक ज्ञाताकडून आज्ञाताकडे घेवून जाणारी चळवळ होय. एखाद्या विशिष्ट विषयाबाबची शास्त्रीय माहिती मिळविण्याचा प्रयत्न म्हणजे संशोधन होय. अशी व्याख्याही एखाद्याकडून केली जाऊ शकते. तत्वतः संशोधन ही एक शास्त्रीय चिकित्सा करण्यासाठी केलेली कृती होय. लर्नस ॲडव्हान्स्ड इंग्लिश शब्दकोषात " संशोधन म्हणजे ज्ञानाच्या कोणत्याही शाखेअंतर्गत नव्या तथ्यांसाठी घेण्यात येणारा जाणीवपूर्वक शोध किंवा चौकशी होय." अशी संशोधनाची व्याख्या स्पष्ट केली आहे. ("Research is a Careful investigation or inquiry especially through search for new facts in any branch of knowledge". - The Advanced Learner's Dictionary of Current English.)

पाश्चात्य संशोधन ही तंत्रिक अर्थाने शैक्षणिक कार्याच्या स्पष्टीकरणासाठी वापरली जाणारी एक संकल्पना आहे. अशा प्रकारे संशोधन म्हणजे अस्तित्वात असलेल्या ज्ञान भांडाराचा विकास होऊन त्याचा यासाठी त्यात घातलेली मूळ ज्ञानरुपी भर होय.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Empowered Autonomous)

Scanned with OKEN Scanner

• सामाजिक संशोधनाच्या काही महत्वाच्या व्याख्या.

1] श्रीमती पॉलीन व्ही. यंग :- "सामाजिक संशोधन एक शास्त्रीय योजना असून जिचा उद्देश तार्किक आणि क्रमबद्ध पद्धतीद्वारा नवीन तथ्यांचा शोध घेणे किंवा जुन्या तथ्यांचे पुनर्परीक्षण आणि त्यांच्यात आढळून येणारे अनुक्रम, अंत:संबंधी कार्यकारण भाव आणि त्यांना संचलित करणाऱ्या नैसर्गिक नियमांचे विश्लेषण करणे हा आहे."

2] रेडमन आणि मुरी :- "सामाजिक संशोधन हा नव ज्ञान प्राप्तीचा एक पद्धतशीर प्रयत्न होय."

3] एस. स्लेसिंजर आणि एम स्टीफीनसन :- "ज्ञानाच्या कक्षा विस्तारित करणे, त्याची अचूकता तपासणे आणि सिद्धांताच्या मांडणीसाठी किंवा कलेच्या व्यावहारिक उपयोगासाठी हे ज्ञान कितपत उपयोगी पडते हे पाहण्यासाठी शास्त्रीय पद्धती शोधून काढणे, त्यांचे विश्लेषण करणे आणि सामाजिक जीवनाच्या संकल्पना मांडण्याची व्यवस्थित पद्धत म्हणजे सामाजिक संशोधन होय."

4] बोगार्डस :- "सामाजिक संशोधन म्हणजे एकत्रित राहणाऱ्या लोकांच्या जीवनातील क्रियाशील, अंतर्भूत प्रक्रियांचे संशोधन होय."

5] व्हिटने :- "मानवी समूहाच्या संबंधाच्या अध्ययनाचा समावेश समाजशास्त्रीय संशोधनामध्ये होतो."

6] क्लिफोर्ड मुडी :- यांच्या मते "संशोधनामध्ये समस्येची व्याख्या व पुर्नव्याख्या करणे, अभ्युपगमांची मांडणी करणे किंवा उपाययोजना सुचवीने, तथ्यांचे संकलन, संघटन आणि अर्थशोधन करणे, तर्क मांडणे, उपाययोजनांचा शोध घेणे आणि शेवटी मांडलेल्या

अभ्युपगमांशी शोधलेले उपाय सुसंगत आहेत का याची चाचणी घेणे या बाबींचा समावेश होतो."

• सामाजिक संशोधनाची वैशिष्ट्ये.

1] सामाजिक घटनांचा अभ्यास :- सामाजिक घटनांच्या सर्वांगीण अभ्यास सामाजिक संशोधनात केला जातो. यामध्ये समाजाच्या एक सदस्य या नात्याने मानवाच्या विविध परिस्थिती विषयीचे दृष्टिकोण त्याच्या भाव-भावना, वर्तन प्रतिक्रिया आणि यांच्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक घटनांच्या विषयी संशोधन केले जाते. याप्रमाणे मानवी समाजात आढळणारे विविध समूह, संस्था, मानवी संस्कृती याबाबत संशोधन केले जाते. थोडक्यात सामाजिक संशोधनात समाजात आढळून येणाऱ्या सामाजिक घटनांच्या संशोधनावर भर दिला जातो.

2] नव तथ्यांचा शोध व जुन्या तथ्यांचे परिक्षण :- कोणत्याही शास्त्राच्या संशोधनात नव्या तथ्यांचा शोध घेणे, त्यांचा सहसंबंध विशद करणे एखादया घटनेमागील नियमांचा नव्याने शोध घेणे हे उद्दिष्टे असते. त्याचप्रमाणे जुन्या तथ्यांचे व संकल्पनांचे नव्या परिस्थितीत व संशोधनाच्या नवनव्या साधनांचा वापर करून पुनर्परीक्षण करणे शास्त्रांच्या विकासाच्या दृष्टीने अगत्याचे असते. समाजशास्त्रातही या दोन्ही उद्देशांनी विपुल संशोधन झाले आहे. याच्यामध्ये परिणामी नव्या तथ्यांचा शोध घेणे व जुन्या संकल्पनांमध्ये सुधारणा घडवून आणणे शक्य झाले आहे.

3] कार्यकारण संबंधाचा शोध घेणे :- सामाजिक संशोधनात समाजजीवन जगत असताना मानवाकडून घडून येणाऱ्या विविध वर्तनामागील कार्यकारण संबंधाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला जातो. मानवाकडून घडणाऱ्या विविध संमिश्र व गुंतागुंतीच्या क्रियामागे एखादया नियम अगर सलगता

Scanned with OKEN Scanner

आढळते की नाही याचा शोध होणे आवश्यक आहे. वरवर पाहता मानवी दृष्टिकोन, वर्तनातील स्वाभाविकता अगर वर्तन यामागे कोणतीही निश्चत व्यवस्था आढळून येणार नाही. पण अत्यंत सूक्ष्मपणे आणि संथगतीने विविध स्वरूपाच्या मानवी वर्तनाचे शास्त्रीय विश्लेषण केले असता व त्याआधारे तार्किक निष्कर्ष मांडण्याचा प्रयत्न केला मानवी वर्तन निश्चित नियम, निश्चित पद्धत आणि सार्वत्रिक नियम यांनी प्रेरित झाले असल्याचे स्पष्ट होते. म्हणूनच मानवी वर्तनामागील अशा कार्यकारण संबंधाचा शोध होणे व त्याच्या साहाय्याने मानव समाजाच्या विकासाला निश्चित दिशेने गती देणे शक्य होते.

4] वैज्ञानिक पद्धतीचा वापर :- वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करूनच सामाजिक संशोधन केले जाते. ही वैज्ञानिक पद्धती हाच सामाजिक संशोधनाचा पाया असून निरीक्षण, तथ्यांचे संकलन, वर्गीकरण आणि परीक्षण अशा वैज्ञानिक पायऱ्यांच्या आधारानेच निष्कर्ष सामाजिक संशोधनात मांडले जातात. परिणामी, संशोधनातील वैज्ञानिक पद्धतीचा केला जाणारा वापर हे सामाजिक संशोधनाचे एक वैशिष्ट्य बनते.